# देवाचं पानी

## रत्नाकर वाणी

पुनरारंभ

© पुनरारंभ

website: http://www.rajratna.co.in Email: ratnakar.wani@rajratna.co.in

# देवाचं पानी

देख वं बहीनं देवाचं पानी उनं
तुले, माले, हयाले, त्याले अन् समद्यानले सुखावनं ॥ धृ,॥
धरनी माय उन्हानं कावली
देवाच्या पान्यानं कशी सुखावली
काया मायेच्या पोटात बीज रूजलं
कोवळ अंकुर अवनीवर अवतरलं ॥१॥
बयीराजाले ते लईच भावलं
पोटच्या पोरावानी त्याले जपलं
खत खावाडलं, पानी पिवाडलं
गुराढोरापासून वाचिवलं
जीव लावून त्याले मोठं केलं ॥२॥
काया माय़ेची माया बी गहरी
देवाच्या पान्यानं दिली उभारी
दिसापरीस रोप वाढलं
फळा फुलांनी बघ कसं तरारलं ॥३॥

बघता बघता रूप कसं पालटलं
पांढरा कापूस, हिरवी केळी, मोत्यावानी ज्वारी
काया मायनं जनू रंगीत लेनं पांघरलं
घामाचं मोती झालं, तुहय़ा माहय़ा कष्टाले फळ मियालं ॥४॥